पुण्यनगरी - 15 जुलै, 2018

# प्रा. कविता बागवे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कमला कॉलेजमधील गृहशास्त्र विभागाच्या प्रा. कविता बागवे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील उपस्थित होते.

प्रा. कविता बागवे म्हणाल्या, मी ताराराणी विद्यापीठाची विद्यार्थिनी होते आणि याच विद्यापीठामध्ये मला सेवा करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य आहे. संस्थेने मला सहकार्य केल्याबद्दल आभारी आहे. डॉ. क्रांतीकुमार पाटील म्हणाले, कमला महाविद्यालयात काम करताना प्रा. बागवे यांनी प्रामाणिकपणे काम केले. त्यांनी माजी विद्यार्थिनी संघटनेच्या रुपातून चांगले काम केले. ताराराणी विद्यापीठामध्ये वेगवेगळ्या कला गुणांचा विचार करून सेवक भरती केली. त्यामध्ये काही चित्रकार, काही उत्तम गायकांचा समावेश होता.



**कोल्हापूर : प्रा. कविता बागवे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करताना डॉ. क्रांतिकुमार पाटील. सोबत प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील व मान्यवर.**

प्रास्ताविक प्रा. डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी केले. प्रा. रेखा पंडित यांनी आभार मानले. प्रा. बागवे यांच्याविषयी प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, प्रा. ए. ए. रांगणेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

Scanned by CamScanner